स्थायी समितीच्या **शुक्रवार** दिनांक **07—10—2011** रोजी दुपारी **12—30** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. संदिप दिवाकर जोशी | अध्यक्ष |
| 2. | श्री. विकास उर्फ बाबा माधवराव मैंद | सदस्य |
| 3. | श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |
| 4. | सौ. उषा गोपाल बोहरे | सदस्या |
| 5. | श्री. भारतभूषण ऋषीपंत गायधणे | सदस्य |
| 6. | सौ. मंदाताई उर्फ आक्का गंगाधर लेंडे | सदस्या |
| 7. | श्री. अरुण वसंतराव डवरे | सदस्य |
| 8. | सौ. सिंधु रामाजी उईके | सदस्या |
| 9. | सौ. कल्पना सुरेश डवरे | सदस्या |
| 10. | श्री. मोहम्मद कामील अंसारी मो. हसन | सदस्य |
| 11. | डॉ. मिलींद माने | सदस्य |
| 12. | श्री. राहुल सुखदेव तेलंग | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. बंडू उर्फ सुधिर हरिदास राऊत | सदस्य |
| 2. | श्री. प्रविण आत्माराम सांदेकर | सदस्य |
| 3. | श्री. अरविंदरपाल सिंग उर्फ बब्बी बावा | सदस्य |
| 4. | श्री. झुल्फेकार अहमद शेख अहमद भूट्टो | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. संजय निपाणे, अति. उप निगम आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक 93** :— वार्ड क्र. 70, महाल येथे पार्कींग आणि बॅडमिंटन कोर्ट चे बांधकामास्तव प्राप्त निम्नतम निविदाकार मे. रफीक अहमद रियाझ अहमद, यांची प्राकलनीय दरापेक्षा 8.85 टक्के कमी दराची रु. 37,53,265/— राशीची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 94** :— म.न.पा. ठराव क्र. 222 दि. 05/05/2011 अन्वये म.न.पा. चे दवाखाने पी.पी.पी. प्रकल्पा अंतर्गत चालविण्याकरिता म.न.पा. महासभेद्वारा मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. महाल रोग निदान केंद्र येथे डायलिसीस सेंटर सुरु करण्याकरिता ई.ओ.आय. मार्फत दर मागविण्यात आले आहेत. सर्वात कमी दर **मेसर्स अश्विनी किडणी व डायलिसीस सेंटर** यांचे असल्यामुळे (प्रती व्यक्तीस डायलिसिसचे दर रु. 1000/— असून पैकी रु. 500/— म.न.पा. व रु. 500/— रुग्णाकडून) त्यांना त्यांच्या हॉस्पीटलमध्ये दहा वर्षाकरिता प्रकल्प चालविण्याकरिता मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित निविदा एकमताने मंजूर. तसेच म.न.पा.चे स्वतःचे डायलिसीस सेंटर सुरु करण्या करिता अर्थ संकल्प 2011 — 12 मध्ये या योजनेस मंजूरी आहे व त्या करिता अर्थसंकल्पात आर्थीक प्रावधान सुध्दा करण्यांत आले आहे. करिता प्रशासनाने मुळ प्रस्तावाप्रमाणे म.न.पा.चे स्वतःचे डायलीसीस सेंटर निर्माणा करिता पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा प्रस्ताव सात दिवसाच्या आत स्थायी समिती समोर सादर करावा. व हे डायलिसीस सेंटर स्वर्गीय प्रभाकरराव दटके रोग निदान केंन्द्रात सुरु करावे यास स्थायी समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 95** :— स्थायी समिती, नागपूर महानगरपालिका ठराव क्र. 44 दि. 7.7.2011 अन्वये पारीत केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या Transaction Advisory मध्ये समाविष्ठ एकूण 13 एजन्सीकडून रितसर निविदा मागविण्याची प्रक्रिया करण्यात आली. परंतू फक्त 1) M/s Crisil Risk and Infrastructure Solution Pvt. Ltd. आणि 2) M/s Feedback ventures Pvt. Ltd., India या दोनच एजन्सीने प्रतीसाद देवून निविदा सादर केल्या. निविदांची तांत्रिक पडताळणी केली असता फक्त M/s Crisil Risk and Infrastructure Solution Pvt. Ltd. या संस्थेने पात्रतेच्या अटी व निकषांची पूर्तता केली आहे. M/s Feedback ventures Pvt. Ltd., India या संस्थेने अटी व निकषांची पूर्तना न केल्यामुळे अपात्र ठरविण्यात आले. त्यामुळे फक्त M/s Crisil Risk and Infrastructure Solution Pvt. Ltd. या एजन्सीची वित्तीय निविदा उघडण्यात आलेली असता नमूद दर प्रती माह रु. 4.90 लक्ष आहे. तथापि या पूर्वी सादर केलेली जून्याच दरावर म्हणजेच रु. 4.00 लक्ष प्रती माह आणि 10.30 टक्के सेवा शुल्क सह एकूण रु. 52.94 लक्ष प्रती वर्ष खर्चाला मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 96** :— मे. डेकोफर्न कन्सट्रक्शन यांना वाहतुक सिग्नल देखभाल व दुरुस्ती च्या कामाचे दिनांक 25.2.2011 रोजी कार्यादेश देण्यात आले असून काम दि.1.3.2011 पासून हस्तांतरीत करण्यात आलेले आहे. तसेच याच बरोबर त्यांना शहरातील एकुण 48 जुणे वाहतुक सिग्नल ला एल.ई.डी. बेस द्वारे नविनीकरण करण्याकरीता चे कार्यादेश मार्च 2011 मध्ये देण्यात आले असून कामाच्या कालावधी 4 महिने होता जो 31 जुलै 2011 रोजी संपलेला आहे. परंतु मे. डेकोफर्न कन्सट्रक्शन यांनी आज पर्यंत फक्त दोन जंक्शनचे काम पुर्ण केलेले आहे. शहरात एकुण 77 जुने वाहतुक सिग्नल असून या पैकी 24 वाहतुक सिग्नल पुर्णतः बंद आहे. मे. डेकोफर्न कन्सट्रक्शन हे जुने वाहतुक सिग्नलची मागील 5 महिन्यापासुन न दुरुस्ती करीत आहे.

आणि नविनीकरण सुध्दा करीत नाही. यामुळे वाहतुक पोलीस विभागातर्फे अनेक पत्र येवून वर्तमान पत्रात सुध्दा अनेकदा बातमी येत आहे. या संबंधी कंत्राटदाराला अनेक पत्र देण्यात आले परंतु तो काम केल्याबद्दल खोटे पत्र देतात. वाहतुक सिग्नल ची देखभाल व दुरुस्ती च्या कामा अंर्तगत मागील 5 महिन्यात त्यांनी फक्त फ्युज बल्ब बदलण्याचे काम केलेले आहे. देखभाल व दुरुस्ती अंतर्गत रिफलेक्टर ची सफाई करणे, पेटींग करणे, वाकलेले किंवा पडलेले पोल पुन्हा उभारणे, खराब झालेले केबल बदलने इत्यादीचे काम केलेले नाही. या संबंधी दि. 1.8.2011 रोजी हितवाद या वर्तमान पत्रात शहरातील बंद असलेले वाहतुक सिग्नल संबंधी बातमी प्रसिध्द झाली, मा. अध्यक्ष, स्थायी समिती, म.न.पा. महोदयांनी आपल्या कक्षेत दि.2.8.2011 रोजी म.न.पा. वाहतुक विभाग, वाहतुक पोलीस विभागाचे सहाही शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मे. डेकोफर्न कन्सट्रक्शनचे प्रतिनिधी बरोबर बैठक घेतली बैठकीत ठरल्यानुसार प्रत्येक वाहतुक शाखे प्रमाणे प्रति दिवस एक शाखेची संयुक्तीक पाहणी करवुन तयार करण्यात आलेला अहवाल खालील प्रमाणे आहे.

## नागपूर शहरातील बंद असलेल्या वाहतुक सिग्नल करीता संयुक्तीक पाहणीच्या अहवाल

| संयुक्तीक पाहणीचे ठिकाण | एकूण वाहतुक सिग्नल जंक्शन | एल ई डी बेस वाहतुक सिग्नल जंक्शन | जुने वाहतुक सिग्नल जंक्शन | पूर्णतः बंद वाहतुक सिग्नल जंक्शन | 50 टक्के पेक्षा जास्त लॅम्पहेड बंद असलेले वाहतुक सिग्नल जंक्शन | बंद असलेले टायमर जंक्शन | पोल कॅप नसलेले जंक्शन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वाहतुक पोलीस शाखा – पूर्व | 18 | 8 | 10 | 3 Old | 7 | 2 | 3 |
| वाहतुक पोलीस शाखा – पश्चिम | 33 | 16 | 17 | 7 Old<br>3 LED | 4 | 5 | – |
| वाहतुक पोलीस शाखा – दक्षिण | 40 | 13 | 27 | 7 Old<br>2 LED | 9 | 6 | 12 |
| वाहतुक पोलीस शाखा – उत्तर | 20 | 7 | 13 | 3 Old | 4 | – | 3 |
| वाहतुक पोलीस शाखा – एम.आय.डी.सी. | 9 | 3 | 6 | 3 Old | 2 | 2 | 3 |
| वाहतुक पोलीस शाखा – इंदोरा | 12 | 8 | 4 | 1 Old | 1 | 3 | 5 |
| **एकूण** | **132** | **55** | **77** | **24 Old<br>5 LED** | **27** | **18** | **26** |

1) एकूण वाहतुक सिग्नल जंक्शन – 132
2) एल.ई.डी. बेस वाहतुक सिग्नल जंक्शन – 55 (यापैकी 5 बंद)
3) जुने वाहतुक सिग्नल जंक्शन – 77 (यापैकी 24 बंद)
4) 50 टक्के पेक्षा जास्त लॅम्पहेड बंद असलेले वाहतुक सिग्नल जंक्शन – उरलेले 53 जुने वाहतुक सिग्नल पैकी 27

मे. डेकोफर्न कंन्स्ट्रक्शन आणि मे. न्यक्लीऑनिक्स (पूणे) यांना शहरातील क्रमशः एकुण 48 आणि 8 जुणे वाहतुक सिग्नलला नविनीकरण करण्याकरीता चे कार्यादेश मार्च 2011 मध्ये देण्यात आले असून कामाच्या कालावधी 31 जुलै 2011 रोजी संपलेला आहे. जुणे वाहतुक सिग्नल आणि एल ई डी बेस वाहतुक सिग्नलच्या विद्युत देयकामध्ये रुपये 6000/– च्या फरक आहे. एल ई डी बेस वाहतुक सिग्नल मुळे 90 टक्के विद्युत उर्जा ची बचत होते आणि यामुळे म.न.पा. ची प्रति जंक्शन रुपये 6000/– ची आर्थीक बचत होते. जर मे.

डेकोफर्न कंन्स्ट्रक्शन आणि मे. न्यक्लीऑनिक्स (पूणे) यांनी क्रमशः 48 आणि 8 जुने वाहतुक सिग्नल ला 4 महिण्याच्या अवधीत पूर्ण केले असते तर 31 ऑगस्ट 2011 पासुन प्रति माह रुपये 3,36,000/— म.न.पा. ची बचत होणे सुरु झाली असती. हि बाब लक्षात घेवून मुदत वाढ देण्याच्या प्रश्न विचारात घेण्यात येईल. या करीता कंत्राटदाराला पत्र देण्यात आलेले आहे.

मे. डेकोफर्न कंन्स्ट्रक्शन नी आजच्या तारखेस (24.8.2011) फक्त 4 चौकाचे नविनीकरण केले आहे.

मे. डेकोफर्न कंन्स्ट्रक्शन चे पत्र व्यवहारा वरुन दिसून येते की त्यांनी म.न.पा. त फार जास्त मोठया रक्कमेची कामे हाती घेतलेली आहे. आणि तो ही कामे करण्यास आर्थिक दृष्टीने असमर्थ दिसते. करीता तो नविन काम घेवून सुध्दा कामाची सुरुवात फार मंद गतीने करीत असुन पूर्ण न झालेल्या कामाचे देयकांची मागणी करते.

प्रस्तावित कार्यवाही :— मे. डेकोफर्न कन्स्ट्रक्शन यांना दिनांक 19.07.2011, 03.08.2011, 5.8. 2011 आणि 11.8.2011 (3 पत्र) मार्फत बंद असलेले वाहतुक सिग्नलची दुरुस्तीचे काम वेळेवर न केल्यास करारनाम्यात नमूद तरतुदी नुसार पेनाल्टी लावण्याची सुचना देण्यात आलेली आहे. तसेच 48 जुने सिग्नलला एल ई डी बेस द्वारे नविनीकरणाचे काम 31 जुलै 2011 पर्यंत पूर्ण न केल्यामुळे प्रति जंक्शन रुपये 6000/— प्रतिमाह प्रमाणे एकूण रुपये 2.88 लक्ष प्रतिमाह म.न.पा. च्या ऑगस्ट, 2011 पासून बचत होणे सुरु झाली असती या बाबत मुदतवाढ देण्यापूर्वी त्याचे कडून दिनांक 5.8.2011 रोजी पत्र देवून स्पष्टीकरण मांगविण्यात आले आहे. उत्तर अप्राप्त आहे.

वरील प्रमाणे अहवाल स्थायी समिती समक्ष उचित निर्णयार्थ ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन नियमाप्रमाणे योग्य कार्यवाही करण्यास्तव कार्यालयास विषय परत करण्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 97</u> :— वार्ड क्र. 115, येथील जयताळा ते एकात्मता नगर या डि. पी बांधकाम करण्याकरिता तयार करण्यात आलेल्या रु. 3,64,21,389/— च्या सुधारीत प्राकलनास मान्यता प्रदान करुन हे काम सध्या करिता असलेले कंत्राटदार मे. आर.एम.गोपलानी यांचेकडून त्यांचे मंजुर निविदा दरानुसार (21.99 टक्के कमी दराने) करण्यास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन आर्थिक वर्ष 2011—12 मध्ये रु. 1.50 कोटी कार्यादेश राशी सिमित ठेवण्याच्या अटीवर तरतूद देण्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 98</u> :— नविन प्रशासकीय इमारतीच्या " Supply and installation of Modular furniture work of New Administrative Building at Civil Lines, NMC Magpur, या कामाकरीता बोलाविण्यात आलेल्या निविदा राशी रु. 2,0,199,000/— च्या कामाची निम्नतम निविदाकार M/s Debono Flexcom (I) Ltd यांची रुपये 2,30,26,860/— ची प्राकलनिय दरापेक्षा 14 टक्के जास्त दराची निम्नतम निविदा स्विकार करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 99</u> :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर